**प्रेसनोट दिनांकः ०८/०३/२०१९**

**भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.**

**महिलांना वैश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणा-या फरारी आरोपीस अटक**

---

दिंनाक ०५/०३/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस सहा. पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व अभिजीत जाधव यांना त्याच्या गुप्त बातमीदारा मार्फतीने बातमी मिळाली की, कोरेगाव पोलीस ठाणेच्या कडील अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा (पीटा अॅक्ट) प्रमाणे दाखल असणाया गुन्हयामधील पाहिजे असणारा आरोपी रुपेश उर्फ नुतन मुनोत हा बालाजीनगर धनकवडी,पुणे येथे येणार आहे. मिळालेल्या बातमीप्रमाणे बालाजीनगर धनकवडी येथे श्रीशैल चिवडशेटटी व गणेश चिंचकर व पोलीस शिपाई अभिजीत जाधव असे जावुन पाहिजे आरोपी रुपेश उर्फ नुतन हरकचंन्द मुनोत,वय ४५ वर्षे, रा. शितल अर्पा. प्लॅट नं.२९, बालाजीनगर, धनकवडी पुणे हा बालाजीनगर धनकवडी पुणे यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस घेवुन आलो. ताब्यात घेतलेल्या आरोपीताकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास केला असता तो कोरेगाव पोलीस ठाणे कडील गुरन. ९६/२०१९ पिटा अॅक्ट कलम.३,४,५ प्रमाणे दाखल असणाया गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असुन त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यास पुढील कारवाई कामी कोरेगाव पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आले असुन कोरेगाव पोलीस ठाणे अधिक तपास करित आहेत.

सदर कामगिरी अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे मा.श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ-२ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चन सिंग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री व्हि. पी. नांदेडकर, स्वारगेट विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेटटी, पोलीस कर्मचारी गणेश चिचंकर, अभिजीत जाधव, महेश मंडलीक, अभिजीत रत्नपारखी, कृष्णा बढे, कुंदन शिदे, सचिन पवार, राहुल तांबे, सर्फराज देशमुख, यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.**